| | | | |
|---|---|---|---|
| MHRG160000612025 | खटला दाखल तारीख | : | ११.०३.२०२५ |
| | खटला नोंदणी तारीख | : | ११.०३.२०२५ |
| | खटला निकाल तारीख | : | १७.०३.२०२६ |
| | कालावधी | : | वर्ष महिने दिवस |
| | | | ०१ ०० ०६ |

## मे. न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, पाली–सुधागड यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी श्री.रा.अ.शिवरात्री )

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३३/२०२५.**

**निशाणी क्र. १९/ब.**

(पहिली खबर क्र.१२५/२०२४,
पाली पोलीस ठाणे)

भाग अ
(para 44(i) of Chapter VI of Criminal Manual)

| | | |
|---|---|---|
| **अभियोगपक्ष** | :: | **महाराष्ट्र शासनतर्फे पाली पोलीस ठाणे** |
| **प्रतिनिधीत्व** | :: | **सरकारतर्फे विधीज्ञ श्रीमती व्ही. व्ही. म्हात्रे,** |
| **आरोपी** | :: | **बबन विठ्ठू सुतक,**<br>वय–३५ वर्षे, व्यवसाय–मोलमजुरी,<br>रा.वावंडे ठाकुरवाडी,ता.सुधागड, जि.रायगड |
| **प्रतिनिधीत्व** | :: | **आरोपीतर्फे विधीज्ञ श्रीमती अक्षरा देशमुख,** |

भाग ब

(para 44(ii) of Chapter VI of Criminal Manual)

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | १५.१०.२०२४ |
| प्रथम माहिती अहवाल नोंद दिनांक | १५.१०.२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ११.०३.२०२५ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २४.०३.२०२५ |
| पहिला साक्षीदार तपासल्याचा दिनांक | २६.०५.२०२५ |
| शेवटचा साक्षीदार तपासल्याचा दिनांक | २८.०१.२०२६ |
| निकाल राखून ठेवल्याची दिनांक | --- |
| निकालाचा दिनांक | १७.०३.२०२६ |
| शिक्षा झाल्याचा दिनांक | --- |

## आरोपीचा तपशील

| आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटण्याची तारीख | गुन्हे दाखल | निर्दोष असो वा दोषी | चौकशी दरम्यान तुरुंगात गेल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| **बबन विठ्ठू सुतक,** | बी.एन.एस.एस. ३५(३) प्रमाणे नोटीस. | - | महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६५- ई अन्वये | निर्दोष | - |

भाग क

(para 44(iii) of Chapter VI of Criminal Manual)

## अभियोग पक्ष/बचावपक्ष/न्यायालयाचे साक्षीदारांची यादी

### अ. अभियोग पक्ष –

| **अनु.क्र.** | **नाव** | **निशाणी क्रमांक** | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी,पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकिय अधिकारी, पंच व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|---|
| ०१. | राम विठ्ठू सुतक | ०७ लगत | पंच |
| ०२. | रावजी गोपाल वारे | ०७ लगत | पंच |
| ०३. | काकासो मुरलीधर गडदे | ०७ लगत | फिर्यादी |
| ०४. | वृषाली यशवंत मान्टे | ०७ लगत | साक्षीदार |
| ०५. | राम मोरोती पवार | ०७ लगत | तपासिक अंमलदार |

### ब.बचावाचे साक्षीदार, जर असतील तर –

| **अनु.क्र.** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी,पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकिय अधिकारी, पंच व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| | – | |

### क.न्यायालयाचे साक्षीदार, जर असतील तर –

| **अनु.क्र.** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी,पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | | वैद्यकिय अधिकारी, पंच व इतर साक्षीदार ) |
| - | | |

## अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयाचे साक्षीदारांनी सिध्द केलेल्या कागदपत्रांची यादी.

### अ.अभियोग पक्षाचे निशाणी क्रमांक –

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | ०९,फिर्यादी सा.क्र.०३ | तक्रार |
| ०२. | १२,अ.सा.क्र.०४ | ६३(१) चे प्रमाणपत्र |
| ०३. | १४,अ.सा.क्र.०५ | घटनास्थळाचा पंचनामा |
| ०४. | १५,अ.सा.क्र.०५ | मुद्देमाल पावती |
| ०५. | १६,अ.सा.क्र.०४ | राष्ट्रीय प्रयोग शाळेस पाठविले पत्र |
| ०६. | १७,अ.सा.क्र.०४ | राष्ट्रीय प्रयोग शाळेचा अहवाल |

### ब.बचावाचे निशाणी क्रमांक–

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | | |

### क.न्यायालयाचे निशाणी–

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| - | | |

## ड. मुद्देमाल

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | – | |

## –:: न्यायनिर्णय ::–

(दिनांक १७/०३/२०२३ रोजी पारीत)

अभिलेखावरील उपलब्ध पुरावा आणि गुन्हयाचा तपशील पाहता, खालील मुद्दा माझे विचारार्थ निर्माण झाला. त्या मुद्दयाचे निष्कर्ष मी नोंदविले असून, त्याची कारणमिमांसा खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक १५/१०/२०२४ रोजी मौजे वावंडे ठाकुरवाडी येथील गवताळ टेकडीचे बाजुला ता.सुधागड जि.रायगड येथे आरोपी ५ लीटरची गावठ्ठी हात भट्टीची दारु स्वतःच्या फायद्याकरीता विनापरवाना बेकायदेशीररित्या विक्री करण्याच्या उद्देशाने मिळून आला ? | **..नाही..** |
| २. | कोणता आदेश ? | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.** |

## –::कारणमीमांसा::–

०२. प्रस्तुत खटल्यात आरोपी स्वतःच्या फायद्याकरीता ५ लीटरची गावठी हात भट्टीची दारु तयार करुन प्रत्येकी १००/– किंमतीची मुद्देमाल दारु विनापरवाना विक्री करताना मिळून आल्याने अभियोगपक्षाने महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५– ई अन्वये दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत खटल्यामध्ये अभियोग पक्षाने गुन्हयाच्या शाबीतीकरीता एकूण ०५ साक्षीदार तपासले आहेत. त्यामध्ये दोन पंच राम विठु सुतक (अ.सा.क्र.१) व रावजी गोपाळ वारे (अ.सा.क्र.२), फिर्यादी काकासो मुरलीधर गडदे (अ.सा.क्र.३), साक्षीदार वृषाली यशवंत मान्टे (अ.सा.क्र.४), साक्षीदार राम मारुती पवार (अ.सा.क्र.५), साक्षीदार यांच्या साक्ष नोंदविलेल्या आहेत. तसेच कागदोपत्री पुराव्यामध्ये फिर्याद नि.९ कडे, फोटोचे प्रमाणपत्र नि. १२ कडे, घटनास्थळ पंचनामा नि.१४ कडे, मुद्देमाल पावती नि.१५ कडे, राष्ट्रीय प्रयोग शाळेत पाठविलेले पत्र नि.१६ कडे, राष्ट्रीय प्रयोग शाळेचा अहवाल नि.१७ कडे त्यानंतर, अभियोग पक्षाने त्यांचा पुरावा अन्वये पुरशिस देवून बंद केलेला आहे.

**मुद्दा क्र.०१:–**

०४. फिर्यादी काकासो मुरलीधर गडदे (अ.सा.क्र.३) हे २०२४ साली पाली पोलीस स्टेशन येथे पोलीस कॉन्स्टेबल म्हणुन कार्यरत असताना ते दि.१५.१०.२०२४ रोजी त्यांना मौजे वावंडे ठाकुर वाडी येथे गावठी दारुचा व्यवसाय चालु असल्याची गुप्त बातमी मिळाली. पोसई पवार यांनी दोन पंचाना बोलाविले व त्यांना पंच म्हणुन येण्यास विनंती केली व त्यांनी ती मान्य केल्याचे कथन केले. त्यानंतर ते सर्व वावंडे ठाकुरवाडी येथे गवातळ भागात चालत गेले असताना एक इसम गवताळ भागात काहीतरी लपवित असल्याचे

दिसुन आले व त्याने त्यो नाव बबन विठू सुतक असल्याचे सांगितल्याचे कथन करतात. त्यानंतर रासायनिक विश्लेषण करीता काही दारु वेगळी केली व पंचानामा करण्यात आल्याचे नमुद केले. त्यानंतर त्यांनी आरोपीच्या विरोधात फिर्याद दिली व त्यांवर त्यांची सही असल्याचे कथन केले. त्यांनी त्यांच्या उलटतपासादरम्यान घटनास्थळ हे खुले व मोकळे होते व तेथे कोणीही येवु जावु शकत असल्याचे कथन केले.

०५. साक्षीदार वृषाली यशवंत मान्टे (अ.सा.क्र.४) यांचे पुराव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की ते छापा कारवाई करतांना ते हजर होते. त्यामुळे त्यांचा पुरावा संबंधीत ठरतो. मौजे वावंडे ठाकुरवाडी येथील गवताळ भागात चालत टेकडीकडे गेले असता एक इसम पोपटी रंगाचा कॅन लपवित असल्याचे दिसले व त्याचा संशय आल्याने पो.शि. गडदे यांनी त्याला १६.१५ वाजता पकडले असल्याचे सांगितले. त्यानंतर जप्त केलेल्या पोपटी रंगाच्या कॅनमध्ये ०५ लीटर गावठी हातभट्टीची दारु आढळुन आली व पकडलेल्या व्यक्तीला त्योच विचारले असता, त्याने बबन विठ्ठू सुतक असे सांगितल्याचे कथन केले. त्यांनी त्यांच्या ओपो मोबाईलमध्ये काढल्याचे सांगतात व सदरच्या प्रमाणपत्रावर त्यांची सही असल्याचे नमुद केले. त्यांनी त्यांच्या उटतपासामध्ये घटनास्थळ हे बंदिस्त नव्हते व तेथे कोणीही येवु जाऊ शकत असल्याचे सांगितले. घटनास्थळी काढलेल्या फोटोचे तारीख व वेळ नमुद नसल्याचे कबुल केले.

०६. साक्षीदार राम मारुती पवार (अ.सा.क्र.५) यांचे पुराव्यात मौजे वावंडे ठाकुरवाडी येथे एक इसम गवतामध्ये प्लॅस्टीकचा कॅन लपवत असल्याचा मिळुन आला व तेथे दोन पंचांना बोलावुन सदर कॅनमध्ये काय आहे याची पाहणी केली असता त्यामध्ये ५ लीटर गावठी हातभट्टीची दारु असल्याचे निदर्शनास आल्याचे नमुद केले. दोन पंचांसमक्ष तेथे जप्त केलेल्या मुद्देमालाचा

पंचनामा करण्यात आला व कॅनमधील १८० मिली दारु प्लॅस्टीकच्या बाटलीत वेगळी करुन त्याला सिलबंद केले व त्या कारवाईचा पंचनामा त्यांनी स्वत: केला व त्या पंचनाम्यावर त्यांची व दोन पंचांची सही असल्याचे नमुद केले. त्यानंतर जप्त केलेला मुद्देमाल व आरोपीस पाली पोलीस ठाणे येथे घेवुन आले व पोलीस शिपाई गडदे यांनी प्रस्तुत घटनेची खबर लिहुन दिली. त्यांच्या उलटतपासादरम्यान घटनास्थळ खुले व मोकळे होते व तेथे कोणीही येऊ जाऊ शकत असल्याचे कथन केले. तसेच जप्त केलेला पोपटी रंगाचा कॅन बाजारात सहज उपलब्ध होऊ शकत असल्याचे कबुल केले.

०७. येथे हे नमुद करणे आवश्यक आहे की, पंच राम विठु सुतक (अ.सा.क्र.१) व रावजी गोपाळ वारे (अ.सा.क्र.२) हे साक्ष घेत असताना फित्तूर आढळून आले आहे. त्यामुळे त्यांचा साक्षीचा उपयोग सदर खटल्यात उपयोगात येत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे, त्यांनी साहाय्यक सरकारी वकीलांकडून विचारण्यात येणा–या प्रश्नांना त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली. त्यामुळे तेथे पंचाकडून आरोपीचे ताब्यातून सदरचा मुद्देमाल जप्त केला ही बाब सिध्द होवू शकली नाही.

०८. फिर्यादी यांचे पुराव्याचे एकूण अवलोकन केले असता, असे दिसून येते की, आरोपीच्या ताब्यातुन गावठी हातभट्टीची ०५ लिटर दारु जप्त करण्यात आल्या ही बाब फिर्यादी काकासो गडदे (अ.सा.क्र.३) यांचे पुराव्याद्वारे प्राप्त झाले. परंतु घटनास्थळ हे खुले व मोकळे होते व तेथे कोणीही येऊ जाऊ शकत असल्योच सांगितले तसेच जप्त मुद्देमाल पोलीस स्टेशन येथे एकाच रुममध्ये ठेवला जातो असे देखील कथन केले.

०९. येथे हे नमुद करणे आवश्यक आहे की, आरोपी यांचे ताब्यातून फिर्यादी यांनी ०५ लिटर गावठी हातभट्टीची दारु जप्त केले असे नमुद केले.

त्यांचे ताब्यात घेतलेल्या कॅनमधुन १८० मिली. दारु रासायनिक परिक्षणाकामी पाठविले व त्याचा अहवाल पटलावर दाखल केला आहे. आरोपी यांचे सन्मानिय विधिज्ञांनी त्यांचे युक्तीवादामध्ये सदरचा अहवाल सिध्द झाला नाही असे नमुद केले. येथे नमुद करणे आवश्यक आहे की, फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९३ अन्वये सदरचा अहवाल पुराव्यात वाचता येतो. सदरच्या अहवालात अल्कोहोल १२% असल्याचे नमुद करण्यात आले आहे.

१०. इतर सर्व पोलीस साक्षीदाराचे पुराव्याचे अधार ते घटनास्थळी १६.१५ वा. पोहचले तर तपासणी अधिकारी यांचे पुरव्याचे आधारे १६.३० वा. पोहचले. तपासणी अधिकारी यांचे पुराव्याचे आधारे त्यांनी पंचनामा तयार केला परंतु त्यांचे व पंचनाम्यातील पुराव्याचे अवलोकन केले असता पंचनामा १६.३०वा. सुरु केले त्यामुळे तपासणी अधिकारी यांचे पुराव्यावर संशय निर्माण होतो. साक्षीदार क्र.३,४,५ यांचे पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले असता, त्यांचे पुराव्यामध्ये मोठया प्रमाणावर वेळेचे तफावती व त्यांच्या साक्षीमध्ये भिन्न पुरावा देत असल्याचे दिसून येत आहेत. त्यामुळे, त्यांचा पुरावा संशय निर्माण करतो व स्वतंत्र साक्षीदाचा पुरावा हा गुन्हा सिध्द होऊल असा पुरावा अभियोग पक्षास सिध्द करता आला नाही. त्यामुळे कायद्याचे स्थापित तत्व आहे की, अभीयोगपक्षाने कोणत्याही संशयाविना आरोपी विरोधातील गुन्हा सिध्द केला पाहिजे. परंतु, पटलावर प्राप्त झालेला पुरावा हा संशयाविना असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे, मुद्दा क्र.१ चे उत्तर ''नकारार्थी'' नोंदविण्यात येते.

**मुद्दा क्र.०२ :–**

११. मुद्दा क्र.०१ चे उत्तर ''नकारार्थी'' नोंदविल्याने आरोपी निर्दोष

मुक्त होण्यास पात्र ठरतो. म्हणून, मी मुद्दा क्र.०२ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारित करीत आहे.

## :: आदेश ::

०१. महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६५–ई या शिक्षेस पात्र असणा–या अपराधामधुन या खटल्यातील आरोपी **बबल विठ्ठू सुतक,** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

०२. आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

०३. सदर गुन्ह्यात जप्त असलेल्या मुद्देमालाची विल्हेवाट अपिल अथवा अपिल कालावधी संपल्यानंतर मुंबई दारुबंदी जप्त केलेल्या किंवा हक्क काढुन घेतलेल्या वस्तू (विल्हेवाट) नियमन, १९५३ मधील तरतुदीस अधिन राहुन करावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)**

SHIVRATRI RAJU ASHOK

Digitally signed by SHIVRATRI RAJU ASHOK
Date: 2026.03.17 19:59:01 +0530

**ठिकाणः पाली.** **(रा.अ.शिवरात्री)**

**दिनाकः १७/०३/२०२६** **न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, पाली**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment is same word to word as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | Ankush S. Waghmare |
| (b) | Court Name | CJJD & JMFC, Pali |
| (c) | Judgment signed by P.O.on | 17.03.2026 |
| (d) | Judgment uploaded on | 18.03.2026 |